ई–फायलिंग
एस.सी.सी. क्र.५१९/२०२५
विमल वि. संगिता व इतर

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ अन्वयेचा जबाब.**

**सा.क्र. १** शपथेवर नमुद करतो की,
माझे नावः– विमल लक्ष्मण म्हस्के,
माझे वयः– ४० वर्ष, धंदा – शेती,
रा. गवळीशिवरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.

सायंकाळी ०६.०० ते ०६.३० वाजता मी माझ्या घरी बसले होते. माझे सोबत माझा नवरा पलंगावर बसलेला होता. मी चहा करीत होते. त्यावेळेस संगिता लोंढे, सौरभ लोंढे, गौरव लोंढे व राहुल व अनोळखी इसम यांनी घरात येऊन फायटरने डाव्या कानाला मारले. माझ्या उजव्या खांद्याजवळ फायटरने व लाथाने, पायाला, डोळयाला देखील मारहाण केली. त्यामुळे मला डाव्या कानातुन ऐकु ऐत नाही. मी पोलीस ठाण्यात गेले. त्यांनी माझी तक्रार घेतली नाही. मला बसवुन ठेवुन उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यांनी मी दिलेली सहा जणांची नावे घेतली नाही. मी अशिक्षित असल्याने पोलीसांनी दिलेली प्रत दुसऱ्याकडुन वाचनु घेतली. त्यामध्ये सौरभ व संगिता यांची नावे होती. म्हणुन मी औरंगाबाद येथील एस.पी. ऑफिसमध्ये गेले. मला न्याय पाहिजे. त्यातील पोलीसांनी कोणतीच कलमे लावली नाही. माझे एक तोळयाची पोत, झुंबर सहा ग्रॅमचे व एक लाख रुपये त्यांनी नेले. माझ्या नवऱ्याला देखील मारले. आम्हाला चाकु दाखविला. आमच्या जिवाला धोका आहे. आम्हाला न्याय हवा. या व्यतिरिक्त मला काही सांगायचे नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

PATIL PRAJAKTA

Digitally signed by PATIL PRAJAKTA
Date: 2025.06.19 17:27:27 +0530

(पी.बी. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गंगापुर.

दिनांक : १९/०६/२०२५